RELIANCE Infrastructure
Anil Dhirubhai Ambani Group

**Publication :** Loksatta
**Date:** 14/6/2010
Page: 3
Column: 2,3

★ मुंबई, सोमवार, १४ जून २०१० लोकसत्ता ३

# सल्लागार नेमणुकीवरून 'एमईआरसी' अडचणीत

3/2,3

मुंबई, १३ जून / प्रतिनिधी

राज्यातील वीज ग्राहकांचे हित जपण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आणि त्याला अर्धन्यायिक दर्जा देण्यात आलेल्या राज्य विद्युत नियामक आयोगाचे (एमईआरसी) आणि एका प्रमुख वीजपुरवठादार कंपनीचे लागेबांधे असल्याचे वृत्त उघड झाल्यानंतर आता 'एमईआरसी'वर सल्लागार आणि नियामक तज्ज्ञ यांची नियुक्ती करण्यासाठी नव्याने अर्ज मागविण्याची वेळ आली आहे.

'एमईआरसी'वर सदर प्रमुख वीजपुरवठादार कंपनीचे माजी कर्मचारी हे सल्लागार आणि नियामक तज्ज्ञ म्हणून काम करीत असल्याचे उघड झाले असून 'महावितरण' आणि 'आहार' या संघटनेने या सल्लागारांची आणि तज्ज्ञांची हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळेच आयोगाने आता सावध पवित्रा घेत राज्य आणि केंद्रातील ऊर्जा क्षेत्रातील निवृत्त कर्मचाऱ्यांकडून नव्याने अर्ज मागविले आहेत. आयोग आणि प्रमुख वीजपुरवठादार कंपनी यांच्यातील लागेबांधे उघड झाल्यानंतर आयोगाच्या निःपक्षपातीपणाकडे अंगुलीनिर्देश केला जात आहे.

'महावितरण' कंपनीने आपल्या 'एआरआर'मध्ये या सल्लागारांची आणि नियामक तज्ज्ञांची हकालपट्टी करावी, अशी मागणी केली असून 'आहार' या हॉटेल व्यावसायिकांच्या संघटनेनेही तीच मागणी उचलून धरली आहे. 'महावितरण'च्या याचिकेत कोणत्याही सल्लागाराच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नसला तरी त्यांनी आपल्या १८ मुद्द्यांच्या याचिकेत दुसऱ्या क्रमांकाची सदर मागणी केल्याने त्याचे गांभीर्य अधोरेखित होत आहे. दुसरीकडे 'आहार' या संघटनेचे सदस्य विठ्ठल के. आणि रत्ना शेट्टी यांनी आयोगाकडे केलेल्या लेखी तक्रारीत पलानीअप्पन एम. आणि बळवंत जोशी हे अनुक्रमे टाटा इकॉनॉमिक कौन्सिल आणि टाटा पॉवर कंपनीचे माजी कर्मचारी असल्याचा दावा केला आहे. सध्या हे कर्मचारी एबीपीएस इन्फ्रा या आयोगाच्या सल्लागार कंपनीचे प्रवर्तक असून त्यांची नियुक्ती स्पर्धात्मक निविदा मागवून केलेली नसल्याचे म्हटले आहे. त्याचप्रमाणे सुधीर कारखानीस (निर्मिती), जी. एस. राव ((पारेषण), के. बी. लाल (नियामक) आणि ए. आर. खानोलकर (वितरण आणि बेस्टचे माजी कर्मचारी) यांच्याही नावांचा समावेश 'आहार'च्या याचिकेत करण्यात आला आहे. या बाबत ग्राहक संघटनांनी आयोगाच्या नियुक्त्यांबाबतच्या भूमिकेबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. प्रमुख वीज पुरवठादार कंपनीचे माजी कर्मचारी असल्याने या सर्व सल्लागार आणि नियामक तज्ज्ञांना स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय लाभ आणि अन्य सुविधा प्रमुख वीज पुरवठादार कंपनीकडून मिळत असल्याची जोरदार चर्चा ऐकावयास मिळत आहे. ■